जा.क्र.वि.शा./निवडणूक/१०२३/२०१६
पोलीस उप आयुक्त विशेष शाखा-०१
पुणे शहर यांचे कार्यालय
दिनांक :-१६/११/२०१६

**विषय** :- **फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे** मतदान केंद्राचे १०० मीटरचे परिक्षेत्रातील व्यावसायिक दूकाने व आस्थापना बंद ठेवणेबाबत आदेश.

**आदेश**

ज्याअर्थी मा.भारत निवडणुक आयोग, नवी दिल्ली यांचे कडील क्रमांक ३२२/ LET/FUNC/ BIEN/MT-LC-LAC/२०१६ दिनांक १२/१०/२०१६ व ECI /PN/६१/२०१६ दि. १९/१०/२०१६ लगत मा.मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील बीआयई -२०१६/प्र.क्र. ४५९/१६/३३ दिनांक १९/१०/२०१६ रोजीचे पत्रान्वये पुणे स्थानिक प्राधिकारी मतदार संघातुन महाराष्ट्र विधान परिषदेची व्दिवार्षिक निवडणूक २०१६ चा कार्यक्रम जाहीर करण्यात आलेला आहे. दिनांक १९/१०/२०१६ रोजीपासुन आचार संहिता लागु झालेली आहे. पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रामध्ये १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिंग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिग पुणे. हि मतदान केंद्रे असुन दिनांक १९/११/२०१६ रोजी विधान परिषदेचे मतदान होणार आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिंग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिंग पुणे या ठिकाणी विधान परिषदेसाठी ०३ मतदान केंद्रावरील (इमारती) ०३ बुथवर मतदान होणार आहे.

मतदान सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी दिनांक १९/११/२०१६ रोजी नमुद केलेल्या विधानपरिषद निवडणूक मतदान केंद्राच्या परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये मतदानाच्या दिवशी सार्वजनिक शांततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये व सार्वजनिक शांतता बिघडू नये, यासाठी व सदर परिसराचा प्रचारासाठी व इतर कारणांसाठी गैरवापर होण्याची दाट शक्यता असल्याने सदर मतदान केंद्राचे १०० मीटर परिसरात निर्बंध घालणे आवश्यक आहे. अशी माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी मी, **सुनिल रामानंद, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर** या आदेशान्वये फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ मधील अधिकारान्वये पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील १) कै.मधुकर पवळे सभागृह, पिंपरी चिंचवड मनपा बिल्डिग पिंपरी पुणे. २) महात्मा गांधी सभागृह ६ वा. मजला जिल्हा परिषद, पुणे. ३) कॅप्टन वडके सभागृह, पुणे मनपा, बिल्डिंग पुणे. या ०३ मतदान केंद्रे व ०३ बुथवर विधान परिषद निवडणूकीसाठी १०० मीटर सभोवतालच्या परिसरामध्ये दिनांक १९/११/२०१६ रोजी ००.०१ वा. पासून ते मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) ०३ मतदान केंद्राच्या (इमारतीच्या ) परिघापासून १०० मीटर सभोवतालच्या परिसराचे आतील सर्व व्यावसायिक दूकाने,रेस्टॉरन्ट,टपऱ्या वाणिज्यिक आस्थापना (अत्यावश्यक सेवा वगळून) सर्व आस्थापना व तत्सम बाबी बंद ठेवाव्यात.

सदर आदेशाची उल्लंघन करणारी व्यक्ती भा.द.सं.कलम १८८ मधील तरतुदीनूसार कारवाईस पात्र राहील. सदरचा आदेश माझे स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दिनांक १६ /११/२०१६ रोजी देणेत आला आहे.